वर्ष- १२ | अंक- ४२ | मुंबई, मंगळवार,०१ सप्टेंबर २०२६ ते ०७ सप्टेंबर २०२६ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No. PLG/205/2025- 2027

पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

PG|2 कैलास मानसरोवर नेमकं कुठे आहे? नेपाळमार्गे कैलास मानसरोवरला कसं जाता येतं?

3 → बुद्धीच्या देवाचा उत्सव साजरा करताना बुद्धीचा वापर करा

भोजपुरी, हिंदी बोलू पण मराठी बोलणार नाही! ← 4

वाहतूक पोलिसांचा व्हॉट्सॲप नंबर जाहीर

ठाणे पोलिस आयुक्तालयात १८ क्रमांक जारी

वाहतूक नियमभंगाच्या तक्रारी व्हॉट्सॲपवर





व्हॉट्सॲप क्रमांक खालीलप्रमाणे

- ठाणेनगर युनिट -८६५५६५४१७१
- राबोडी -८६५५६५४१७२
- नौपाडा - ८६५५६५४१७३
- कळवा-८६५५६५४१७४
- कोपरी-८६५५६५४१७६
- वागळे-८६५५६५४१७७
- कापुरबावडी-८६५५६५४१७८
- वडवली -८६५५६५४१७९
- भिवंडी-८६५५६५४१८०
- कोनगाव -८६५५६५४१८१
- नारपोली- ८६५५६५४१८२
- कल्याण -८६५५६५४१८३
- डोंबिवली -८६५५६५४१८४
- कोळसेवाडी-८६५५६५४१८५
- उल्हासनगर-८६५५६५४१८६
- विठ्ठलवाडी -८६५५६५४१८७
- अंबरनाथ- ८६५५६५४१८८

१८ अधिकृत व्हॉट्सॲप क्रमांक जारी

पोलिस आयुक्त आशुतोष डुंबरे आणि पोलिस सहआयुक्त डॉ.ज्ञानेश्वर चव्हाण यांच्या आदेशानुसार हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे .ठाणे पोलिस आयुक्तालयातील विविध वाहतूक उपविभागांसठी १८ अधिकृत व्हॉट्सॲप क्रमांक जारी करण्यात आले आहेत. चुकीच्या दिशेने वाहन चालवणे, ट्रिपल सीट, फॅन्सी अथवा नियमबाह्य नंबर प्लेट, नो-पार्किंगमध्ये वाहन उभे करणे,डबल पार्किंग किंवा वाहतुकीस अडथळा निर्माण करणे, तसेच अन्य वाहतूक नियमांचे उल्लंघन आढळल्यास त्याची माहिती संबंधित वाहतूक उपविभागाच्या व्हॉट्सॲप क्रमांकावर पाठवविता येणार आहे .

वाहतूक शाखेचे आवाहन

आता नागरिकांचा कॅमेरा आणि पोलिसांची कारवाई या माध्यमातून नियमभंगकरणाऱ्यांवर तत्परतेने कारवाई होणार आहे . सुरक्षित ,आणि सुरळीत वाहतुकीसाठी नागरिकांनी सहकार्य करावे , असे आवाहन वाहतूक शाखेचे पोलिस उपायुक्त पंकज शिरसाट यांनी केले आहे .

ठाणे: वाहतूक नियमांच्या उल्लंघनप्रकरणी ठाणे वाहतूक शाखेने एक अनोखा निर्णय घेतला आहे. पोलिस आयुक्तालयामध्ये १८ व्हॉट्सॲप क्रमांक जारी केलेत ज्यावर आता वाहतूक नियमभंगाच्या तक्रारी करता येणार आहेत. वाहतूक नियमांच्या उल्लंघनप्रकरणी नागरिकांना तक्रार करण्यासाठी ठाणे वाहतूक शाखेने पोलिस आयुक्तालयामध्ये व्हॉट्सॲप क्रमांक जारी केले आहेत. या क्रमांकावर आलेल्या तक्रारीची अगोदर पडताळणी केली जाईल. त्यानंतर कारवाई करण्यात येणार आहे. वाहनावर ई-चलानद्वारे कारवाई करण्यात येणार प्राप्त तक्रारीतील छायाचित्रे आणि उपलब्ध माहितीच्या आधारे संबंधित पोलिस अधिकारी किंवा कर्मचारी तक्रारींची पडताळणी करतील. नियमभंग झाल्याचे स्पष्ट झाल्यास संबंधित वाहनावर ई-चलानद्वारे कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती वाहतूक शाखेने दिली. सुस्पष्ट छायाचित्रे पाठवण्याचे आवाहन मोबाइलद्वारे तक्रार करताना नागरिकांनी शक्यतो किमान तीन सुस्पष्ट छायाचित्रे पाठवावीत. विशेषतः वाहनाचा नोंदणी क्रमांक स्पष्ट दिसेल,अशा पद्धतीने फोटो काढण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. तक्रारीसोबत वाहन क्रमांक, घटनास्थळ आणि नेमका वाहतूक नियमभमग याची माहिती देणेही आवश्यक असल्याचे वाहतूक शाखेने स्पष्ट केले

स्पा सेंटरमधील तरुणींच्या देहव्यापाराचा पदार्फाश, महिला एजंटला अटक



ठाणे। कापूरबावडी परिसरात स्पा सेंटरमध्ये काम करणाऱ्या तरुणींचा देहव्यापारासाठी पुरवठा करणाऱ्या एका महिला एजंटला अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक शाखेच्या (AHTC) पथकाने सापळा रचून अटक केली. या कारवाईत चार पीडित तरुणींची सुटका करण्यात आली. कापूरबावडी नाका, लेक सिटी मॉलजवळील बर्गर किंग परिसरात महिला एजंट तरुणींचा पुरवठा करण्यासाठी येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार बनावट ग्राहक आणि पंचांच्या मदतीने सापळा रचून पोलिसांनी तिला ताब्यात घेतले. प्राथमिक तपासात संबंधित महिला गेल्या वर्षभरापासून मुंबई, ठाणे, लोणावळा, गोवा आणि गुजरातमधील ग्राहकांशी संपर्क साधून स्पा सेंटरमध्ये काम करणाऱ्या तरुणींचे फोटो पाठवत असल्याचे समोर आले आहे. देहव्यापारासाठी या तरुणींचा पुरवठा केला जात असल्याचा पोलिसांना संशय आहे.

या प्रकरणामागे आणखी कोणाचा सहभाग आहे, तसेच या रॅकेटमध्ये आतापर्यंत किती तरुणींचा समावेश आहे, याचा तपास AHTC पथकाकडून सुरू आहे.

हायवेवर गाडी थांबवताना सावधान



भिवंडी । भिवंडी-ठाणे बायपास मार्गावर जेवणासाठी ट्रक थांबवलेल्या चालकाची लुटीच्या उद्देशाने हत्या करून पसार झालेल्या दोघांना कोनगाव पोलिसांनी अटक केली. तब्बल १५० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज सलग तीन दिवस तपासून आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांनी आरोपींचा माग काढला. पवनकुमार काजू महतो (३३, रा. बिहार) हे टाटा आमंत्रा परिसरात ट्रेलर थांबवून जेवण करत असताना रमीज अब्दुल रशीद अन्सारी (२३) आणि मोहम्मद अलकैश परवेज आलम मोमीन (२५, दोघे रा. भिवंडी) यांनी दुचाकीवरून येत लुटीचा प्रयत्न केला. महतो यांनी प्रतिकार केल्याने आरोपींनी त्यांच्या मानेवर चाकूने वार करून त्यांची हत्या केली आणि पैसे घेऊन पसार झाले. घटनेनंतर कोनगाव पोलिसांनी पाच तपास पथके तयार केली. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या वर्णनाच्या आधारे परिसरातील सुमारे १५० सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने तपासणी करण्यात आली. त्यातून संशयितांची हालचाल स्पष्ट झाल्यानंतर तांत्रिक तपासाच्या आधारे दोघांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली. आरोपी रमीज अन्सारी याच्यावर यापूर्वी एक गुन्हा, तर मोहम्मद मोमीन याच्यावर चोरी व स्नॅचिंगसह तब्बल १८ गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांनी सांगितले. ही कारवाई पोलीस उपायुक्त डॉ. पवन बनसोड, सहायक पोलीस आयुक्त सचिन सांगळे आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक मंगेश बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

एटीएमच्या कार्ड स्लॉटला 'सुपर ग्लू' लावून फसवणूक करणारी चौकडी जेरबंद



कल्याण : एटीएमच्या कार्ड स्लॉटमध्ये सुपर ग्लू लावून ग्राहकांचे कार्ड अडकवायचे आणि त्यानंतर त्यांचा गोपनीय पिन क्रमांक हेरून खात्यातील रक्कम लंपास करणाऱ्या चौकडीचा कोळसेवाडी पोलिसांनी पदार्फाश केला आहे. चक्कीनाका-लोकग्राम परिसरात हा प्रकार उघडकीस आल्यानंतर एका संशयिताला नागरिकांनी रंगेहात पकडले. दरम्यान, घटनास्थळावरून पसार झालेल्या त्याच्या तीन साथीदारांचा पोलिसांनी भिवंडी ते कसारा रेल्वे स्थानकादरम्यान सिनेस्टाईल पाठलाग करून धावत्या एक्स्प्रेसमधून ताबा घेतला. राजेशकुमार रामलालप्रसाद यादव (३१), हरीराम कुमार उमेश सिंग (२५), रोहितकुमार बिनोद सिंग (२६) आणि सुदिपकुमार सुरेंद्र विश्वकर्मा उर्फ सुरदिप (२६) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. हे चौघेही मूळचे बिहारमधील गया जिल्ह्यातील असून सध्या भिवंडीतील राजनोळी गाव आणि कोनगाव परिसरात राहत असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपी एटीएम केंद्रात जाऊन मशीनच्या कार्ड स्लॉटमध्ये सुपर ग्लू लावत असत. त्यामुळे पैसे काढण्यासाठी आलेल्या ग्राहकाचे कार्ड मशीनमध्ये अडकत असे. कार्ड बाहेर निघत नसल्याने ग्राहक गोंधळलेला असताना टोळीतील सदस्य त्याच्या मागे उभे राहून पिन क्रमांक हेरत असत. त्यानंतर ग्राहकाला बनावट हेल्पलाइन क्रमांक देऊन बँकेशी संपर्क साधण्याचा सल्ला दिला जात असे. ग्राहक एटीएम केंद्रातून निघून गेल्यानंतर अडकलेले कार्ड बाहेर काढून त्याचा गैरवापर करीत खात्यातील रक्कम काढली जात असल्याचा पोलिसांचा संशय आहे.

चक्कीनाका-लोकग्राम परिसरातील एका एटीएममध्ये असाच प्रकार घडला. ग्राहकाचे कार्ड मशीनमध्ये अडकल्यानंतर तेथे उपस्थित असलेल्या काही जागरूक तरुणांना संशय आला. त्यांनी संशयिताला पकडून शिवसेना संपर्कप्रमुख महेश गायकवाड यांच्या कार्यालयात आणले. त्यानंतर पोलिसांना माहिती देऊन त्याला त्यांच्या ताब्यात देण्यात आले.

दरम्यान, चौकशीदरम्यान मिळालेल्या माहितीच्या आधारे कोळसेवाडी पोलिसांनी राजनोळी गाव आणि कोनगाव परिसरात शोधमोहीम राबवली. मात्र, उर्वरित तिघे पसार झाल्याचे समोर आले. त्यानंतर पोलिसांनी भिवंडीपासून कसारा रेल्वे स्थानकापर्यंत शोधमोहीम सुरू केली.

डोंबिवली स्कायवॉकवर फेरीवाल्यांचा धिंगाणा



डोंबिवली : डोंबिवली पश्चिम रेल्वे स्थानकाच्या स्कायवॉकवर फेरीवाल्यांनी केलेल्या अतिक्रमणाविरोधात पालिका आणि पोलिसांनी संयुक्त कारवाई केली. मात्र, कारवाईदरम्यान फेरीवाल्यांचा माल खाली फेकला जात असल्याचा आरोप करत काही फेरीवाल्यांनी आक्रमक भूमिका घेतली. यावरून फेरीवाले आणि पालिका-पोलिसांमध्ये वाद निर्माण झाला. या वेळी महिला फेरीवाल्यांसह काही फेरीवाल्यांची पोलिसांशी झटापट झाल्याने स्कायवॉकवर सुमारे अर्धा तास गोंधळाचे वातावरण होते. डोंबिवली पश्चिम रेल्वे स्थानकाच्या स्कायवॉकवर मोठ्या संख्येने फेरीवाले बसत असल्याने प्रवाशांना ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागत होता. स्कायवॉकवरील अतिक्रमणामुळे पादचाऱ्यांना मार्ग मिळत नसल्याच्या तक्रारीही करण्यात आल्या होत्या. या पार्श्वभूमीवर पालिका आणि पोलिसांच्या पथकाने संयुक्तपणे कारवाई सुरू केली.

कारवाईदरम्यान फेरीवाल्यांचे साहित्य हटविण्यात येत असताना काही माल खाली फेकला जात असल्याचा आरोप फेरीवाल्यांनी केला. त्यावरून त्यांनी कारवाईला विरोध करण्यास सुरुवात केली. वाद वाढत गेल्यानंतर काही महिला फेरीवाल्यांसह इतर फेरीवाल्यांची पोलिसांशी झटापट झाल्याचे समोर आले आहे. या घटनेचा व्हिडीओ समाजमाध्यमांवर प्रसारित झाल्याने हा प्रकार चर्चेत आला आहे. दरम्यान, स्कायवॉकवर झालेल्या या गोंधळामुळे काही काळ प्रवाशांनाही त्रास सहन करावा लागला. अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईला विरोध करताना कायदा-सुव्यवस्था बिघडू नये, यासाठी पोलिसांना हस्तक्षेप करावा लागला. स्कायवॉक हा मुख्यतः प्रवाशांच्या सुरक्षित आणि सुरळीत ये-जा करण्यासाठी असताना त्यावर होणारे अतिक्रमण हा गंभीर प्रश्न ठरत आहे. त्यामुळे फेरीवाल्यांवरील कारवाई सातत्याने राबविण्याबरोबरच, कारवाई करताना फेरीवाल्यांच्या मालमत्तेचे नुकसान होणार नाही याचीही दक्षता घेण्याची मागणी होत आहे. या घटनेप्रकरणी पोलीस आणि पालिका प्रशासनाकडून पुढील कारवाई काय केली जाते, याकडे लक्ष लागले आहे.

कळवा रुग्णालयातील जेवणात झुरळ; मनसे आक्रमक

रुग्णांचा संताप; ठेकेदारासह जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

ठाणे : ठाणे महापालिकेच्या कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातील रुग्णांना दिल्या जाणाऱ्या जेवणाच्या दजार्बाबत गंभीर प्रकार समोर आला आहे. २८ ऑगस्ट रोजी वॉर्ड क्रमांक सहामध्ये डोळ्यांच्या शस्त्रक्रियेसाठी दाखल असलेल्या रुग्णाच्या जेवणाच्या ताटात चक्क झुरळ आढळून आले. या प्रकारामुळे रुग्णांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले.

या घटनेची माहिती मिळताच मनसेनेही आक्रमक भूमिका घेतली आहे. रुग्णांच्या आरोग्याशी संबंधित अन्नाच्या गुणवत्तेबाबत प्रशासनाने गांभीयार्ने लक्ष द्यावे, अशी मागणी मनसेचे जनहित व विधी विभागाचे ठाणे शहर अध्यक्ष स्वप्नील महिंद्रकर यांनी केली. संबंधित जेवण पुरवठादार ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्यासह दोषी ठेकेदार आणि जबाबदार रुग्णालय अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली.

कळवा रुग्णालयात दररोज मोठ्या संख्येने रुग्ण उपचारासाठी येतात आणि सुमारे एक हजारहून अधिक रुग्णांना जेवण पुरविले जाते. त्यामुळे रुग्णालयातील स्वयंपाकघर, अन्नाची गुणवत्ता व साठवणूक प्रक्रियेची अन्न सुरक्षा मानकांनुसार तपासणी करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

दरम्यान, रुग्णालय प्रशासनाने या घटनेची दखल घेत कायदेशीर चौकशीची



प्रक्रिया सुरू केल्याचे स्पष्ट केले आहे.

कैलास मानसरोवर नेमकं कुठे आहे? नेपाळमार्गे कैलास मानसरोवरला कसं जाता येतं?





नेपाळला हिंदूंची एक पवित्र भूमी आणि आध्यात्मिक स्वर्ग मानलं जातं. नद्या, तलाव, दऱ्या आणि उंच पर्वतशिखरांनी नटलेला हा देश निसर्गसौंदर्याने समृद्ध आहे. परंतु, नेपाळला वेळोवेळी मुसळधार पाऊस, पूर, दरडी कोसळणे आणि भूस्खलनासारख्या नैसर्गिक आपत्तींचाही सामना करावा लागतो.

26 ऑगस्टच्या सकाळी नेपाळच्या रसुवा जिल्ह्यात भोटे कोशी नदीला अचानक पूर आला आणि त्यामुळे मोठं नुकसान झालं.

यापूर्वीही नेपाळमध्ये अशा प्रकारच्या नैसर्गिक आपत्ती घडल्या आहेत का? आध्यात्मिक कारणांसाठी विशेषतः हिंदू नेपाळला का जातात? आणि भाविक नेपाळला कसं जातात?

कैलास मानसरोवर नेमकं कुठे आहे?

हिंदू धर्मातील भाविक मोठ्या संख्येनं ज्या कैलास मानसरोवरची तीर्थयात्रा करतात, ते तिबेटमध्ये आहे.

मानसरोवरला जाण्यासाठी 3 मार्ग आहेत. त्यापैकी 2 मार्ग भारतातून, तर एक मार्ग नेपाळमधून जातो.

भारतातून उत्तराखंडमधील लिपुलेख खिंड आणि सिक्कीममधील नाथू ला खिंड या दोन मार्गांनी कैलास मानसरोवर यात्रेला जाता येतं. त्याचप्रमाणे पश्चिम नेपाळमधील हुमला मार्गानेही कैलास मानसरोवर यात्रेला जाता येते.

नेपाळमार्गे कैलास मानसरोवरला कसं जाता येतं?

नेपाळमधील हुमला मार्गे मानसरोवरला जाण्यासाठी एप्रिल ते ऑक्टोबर हा काळ सर्वात योग्य मानला जातो. परंतु, काही भाविक ऑक्टोबरच्या शेवटपर्यंतही मानसरोवरला भेट देत असतात.

मानसरोवरला जाणाऱ्या भाविकांमध्ये भारतीय भाविकांची संख्या जास्त असते. ते आधी काठमांडूहून नेपाळगंजला जातात आणि तिथे एक रात्र मुक्काम करतात. नेपाळगंजहून सुमारे 45 मिनिटांच्या प्रवासानंतर सिमिकोटला जाता येतं.

सिमिकोटहून छोट्या विमानाने हिल्सा येथे जाता येतं. तिथून रस्ते मार्गाने तिबेटमधील तकलाकोटला जाता येतं. तकलाकोटपासूनच मानसरोवरची खरी यात्रा सुरू होते.

भारतातून कैलास मानसरोवरला कसं जाता येतं?

भारताचं परराष्ट्र मंत्रालय दरवर्षी जून ते सप्टेंबरदरम्यान कैलास मानसरोवर यात्रेचं आयोजन करतं. यासाठी उत्तराखंडमधील लिपुलेख खिंड आणि सिक्कीममधील नाथू ला खिंड असे दोन मार्ग आहेत.

एका ट्रॅव्हल वेबसाइटने दिलेल्या माहितीनुसार, उत्तराखंडमधील लिपुलेख मार्गाने कैलास मानसरोवर यात्रेचा अंदाजे खर्च 1 लाख 70 हजार रुपये इतका आहे. या मार्गावर साधारण 200 किमीचा डोंगराळ प्रवास करावा लागतो. यात्रेकरूंना 5 गटांमध्ये पाठवलं जातं आणि संपूर्ण यात्रा पूर्ण होण्यासाठी सुमारे 22 दिवस लागण्याची शक्यता असते.



नाथू ला खिंड मार्गाने कैलास मानसरोवर यात्रेचा अंदाजे खर्च 2 लाख 83 हजार रुपये इतका आहे. या मार्गावर सुमारे 36 किमीचा प्रवास डोंगराळ वाटेतून करावा लागतो. या मार्गाने भाविक 10 गटांमध्ये प्रवास करू शकतात. संपूर्ण यात्रा सुमारे 21 दिवसांत पूर्ण होते.

समुद्रसपाटीपासून 6,638 मीटर उंचीवर असलेलं कैलास पर्वत आणि मानसरोवर तलाव यांना बौद्ध आणि जैन धर्मातही विशेष महत्त्व आहे.

2025 मध्ये भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, यात्रा सुरू करण्यापूर्वी भाविकांची वैद्यकीय तपासणी केली जाते. परराष्ट्र मंत्रालयाच्या नियमानुसार, सर्व भाविकांनी एकत्र प्रवास करून परत येणं आवश्यक आहे. तसेच, सर्व यात्रेकरूंना आपला प्रवास दिल्लीतूनच सुरू करावा लागतो.

यात्रा सुरू करण्यापूर्वी वैध पासपोर्ट, पासपोर्ट आकाराचे 6 रंगीत फोटो आणि 100 रुपयांच्या स्टॅम्पवरील नोटरीकडून प्रमाणित केलेलं नुकसानभरपाईचं पत्र मंत्रालयाने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांकडे जमा करणं आवश्यक आहे.

यासोबत आपत्कालीन परिस्थितीत हेलिकॉप्टरने बाहेर काढण्यासाठीचं प्रतिज्ञापत्र आणि चीनच्या हद्दीत मृत्यू झाल्यास तिथेच अंत्यसंस्कार करण्यासाठीचं संमतीपत्र द्यावं लागतं. या कागदपत्रांमध्ये काही त्रुटी आढळून आल्यास प्रवासाला परवानगी दिली जात नाही.

या यात्रेसाठी कोण अर्ज करू शकतं?

भारतमार्गे कैलास मानसरोवर यात्रेसाठी भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने काही नियम निश्चित केले आहेत. त्यातील पहिली आणि महत्त्वाची अट म्हणजे यात्रेकरू हा भारतीय नागरिक असणं आवश्यक आहे.

यात्रेकरूकडे किमान 6 महिने वैध असलेला भारतीय पासपोर्ट असणं आवश्यक आहे. तसेच, चालू वर्षाच्या 1 जानेवारी रोजी वय किमान 18 आणि जास्तीत जास्त 70 वर्षे असावं.

या यात्रेसाठी भाविक किंवा यात्रेकरूंचा बीएमआय म्हणजेच बॉडी मास इंडेक्स महत्त्वाचा आहे. बीएमआय 25 किंवा त्यापेक्षा कमी असलेल्या व्यक्तींनाच या यात्रेला जाण्याची परवानगी दिली जाते.

या यात्रेला जाणारी व्यक्ती शारीरिक आणि वैद्यकीयदृष्ट्या तंदुरुस्त असणं गरजेचं आहे. परदेशी नागरिकांना या यात्रेसाठी अर्ज करता येत नाही. त्याचप्रमाणे ओव्हरसीज सिटिझन ऑफ इंडिया (ओसीआय) कार्डधारकही या यात्रेसाठी अर्ज करू शकत नाहीत.

'भगवान शिवाचं निवासस्थान मानला जाणारा नेपाळ'

तिरुवन्नमलाई, पोलूरचे गोकुळकृष्णन महाराज सांगतात की, हिंदूंचे प्रमुख देव मानले जाणारे भगवान शिव यांचं निवासस्थान म्हणून नेपाळकडे पाहिलं जातं. त्यामुळे नेपाळ हे आध्यात्मिक पर्यटनाचं महत्त्वाचं ठिकाण मानलं जातं.

तमिळशी बोलताना ते म्हणाले, नेपाळ हा निसर्गसौंदर्य आणि अध्यात्म यांचा सुंदर संगम असलेला एक देश आहे. आयुष्यात एकदा तरी या भूमीवर जावं आणि कैलासाचं दर्शन घ्यावं, अशी हिंदू धर्माच्या अनुयायांची इच्छा असते. त्यानुसार मला देखील 2 वर्षांपूर्वी नेपाळला जाऊन येण्याची संधी मिळाली होती.

नेपाळची राजधानी काठमांडूमधील पशुपतीनाथ मंदिर काशीइतकंच पवित्र मानलं जातं, असं गोकुळकृष्णन यांनी सांगितलं. ते म्हणाले, काशीमध्ये मृत व्यक्तीवर अंत्यसंस्कार केल्यास त्याला स्वर्ग मिळतो, अशी श्रद्धा आहे. त्याचप्रमाणे नेपाळमध्येही मृत्यू झाल्यास स्वर्गात प्रवेश मिळतो, अशी धारणा आहे. काशीमधून गंगा नदी वाहते, त्याचप्रमाणे नेपाळमध्ये पशुपतीनाथ मंदिराजवळून बागमती नदी वाहते.

नेपाळमधल्या एका मंदिरातलं दृश्य

तिथल्या पूजापद्धतीबद्दल त्यांनी सांगितलं, काठमांडूत 2 ते 5 वर्षांच्या वयोगटातील एका विशिष्ट समाजातील मुलीची निवड करून तिची जिवंत देवी म्हणून पूजा केली जाते. सण-उत्सवांच्या काळातच ही 'जिवंत कुमारी' दर्शनासाठी बाहेर येते आणि तिचे आशीर्वाद घेण्यासाठी जगभरातून भाविक येतात. या मुलीला देवीचं रूप मानलं जातं आणि ती वयात येईपर्यंत तिची देवी म्हणून पूजा केली जाते.

त्यांच्या मते, ती मुलगी वयात आल्यानंतर तिची जागा घेण्यासाठी दुसऱ्या मुलीची कुमारी म्हणून निवड केली जाते. नेपाळमध्ये ही परंपरा आजही सुरू आहे. महिलांना देवीचं रूप मानून त्यांची पूजा करण्याचं हे एक प्रतीक मानलं जातं. याचप्रमाणे, भगवती देवीचं मंदिर म्हणून प्रसिद्ध असलेलं मनकामना हेही नेपाळमधील एक प्रमुख धार्मिक स्थळ आहे.

त्याचबरोबर, काठमांडूजवळ नागरकोट, चंद्रागिरी पर्वत आणि सिसपानी यासारखी अनेक ठिकाणं आहेत. परंतु, भव्य सूर्योदय पाहण्यासाठी नागरकोट हे सर्वोत्तम ठिकाण आहे, असं गोकुळकृष्णन यांनी सांगितलं.

त्यामागचं एक कारण म्हणजे, पहाटे हिमालयाच्या पर्वतरांगांमागून उगवणारा सूर्य आणि त्याच्या नारिंगी प्रकाशात उजळून निघणारे डोंगर-दऱ्यांचं सुंदर दृश्य पाहताना देवाचं दर्शन झाल्यासारखं वाटतं, अशी हिंदू भाविकांची श्रद्धा आहे.

त्याचप्रमाणे, बुद्धांचा जन्म झालेलं पवित्र ठिकाण लुंबिनी, भगवान विष्णूंना समर्पित वैष्णव तीर्थक्षेत्र मुक्तिनाथ मंदिर आणि सीतेचं जन्मस्थान मानलं जाणारं जनकपूर सीता मंदिर अशी अनेक धार्मिक स्थळंही नेपाळमध्ये आहेत. या ठिकाणी हिंदू भाविक मोठ्या संख्येने भेट देत असतात.

कैलास पर्वताचं धार्मिक महत्त्व काय?

गोकुळकृष्णन सांगतात, ऋषीमुनींसारखे साधू आणि हिंदू भाविक कैलासाचं दर्शन घेण्याची इच्छा बाळगतात. कैलासला जाऊन पूजा केल्याने आध्यात्मिक परिवर्तन होते, अशी श्रद्धा आहे. कैलास पर्वताची प्रदक्षिणा आणि पूजा ही जगातील महत्त्वाच्या पवित्र तीर्थयात्रांपैकी एक मानली जाते. हा पर्वत मनःशांती आणि एकतेचं प्रतीक म्हणून पूजनीय मानला जातो.हिंदू धर्माच्या मान्यतेनुसार, कैलास पर्वतावर भगवान शिव आपल्या परिवारासह वास करतात. जैन धर्मीय या पर्वताला 'अष्टपद' म्हणतात. जैन धमार्तील 24 तीर्थंकरांपैकी पहिले तीर्थंकर ऋषभदेव यांना याच ठिकाणी ज्ञानप्राप्ती झाली होती, अशीही मान्यता आहे.

तिबेटमधील बौद्ध आणि बोन धमार्चे अनुयायी या पर्वताला 'तिसे' म्हणतात. त्यांच्या श्रद्धेनुसार, हे देवी 'सिपाईमेन'चं निवासस्थान आहे. तर तिबेटी बौद्ध धर्मीय कैलास शिखराला 'डेमचोक' आणि त्यांची पत्नी 'दोर्जे फाग्मो' यांचं पवित्र निवासस्थान मानतात.

गोकुळकृष्णन यांनी सांगितलं, आशियातील 4 प्रमुख नद्या आणि त्यांच्या हिमनद्या या पर्वताच्या शिखरावर 'स्वस्तिक' हे हिंदू धमार्तील एक भव्य प्रतीक साकारतात. सिंधू नदी उत्तरेकडून, कर्णाली नदी दक्षिणेकडून, सतलज पश्चिमेकडून आणि ब्रह्मपुत्रा पूर्वेकडून वाहते. या नद्या आशिया खंडासाठी जीवनदायिनी मानल्या जातात. कैलास पर्वताजवळ असलेलं मानसरोवर देखील पवित्र मानलं जातं.

'ब्रह्मदेवाच्या मनातून निर्माण झालेलं मानसरोवर'

गोकुळकृष्णन सांगतात, हिंदू धर्माच्या मान्यतेनुसार, मानसरोवर तलावाची निर्मिती सर्वप्रथम ब्रह्मदेवाच्या मनात झाली. त्यामुळे या तलावाला 'मानसरोवर' असं नाव पडलं. 'मानसरोवर' हे दोन संस्कृत शब्दांचे मिश्रण आहे. 'मानस' म्हणजे मन किंवा बुद्धी, तर 'सरोवर' म्हणजे तलाव.

कैलास पर्वत-मानसरोवर परिसरात देवतांचा वास असून त्या तिथे ध्यान करतात, अशी श्रद्धा असल्याचं त्यांनी सांगितलं. तसेच, केवळ हिंदूच नाही, तर विविध धर्मांचे आध्यात्मिक श्रद्धा असलेले लोकही या स्थळाला भेट देतात, असं त्यांनी सांगितलं.

त्याचप्रमाणे, तिरुवन्नमलाईचे गोकुळकृष्णन महाराज यांनी ऑक्टोबर आणि नोव्हेंबर हे महिने नेपाळला जाण्यासाठी योग्य असल्याचं सांगितलं.,



संपादकीय

बुद्धीच्या देवाचा उत्सव साजरा करताना बुद्धीचा वापर करा



संपादक दिपक मोरेश्वर नाईक

बुद्धीच्या देवाचा उत्सव साजरा करताना बुद्धीचा, साध्या कॉमन सेन्सचा वापर का केला जात नाही? परंपरेचा अभिमान उठसूठ सांगणारे बांधव उत्सवांची धार्मिक, पवित्र परंपरा का पाळत नाहीत?

मानव हा उत्सवप्रिय प्राणी आहे असे म्हणतात. उत्सवांच्या मागे काही ना काही कारण असते. उदा. ऋतू बदलाची सुरुवात, पिकांच्या हंगामाचे दिवस, ऐतिहासिक घटना वगैरे. नेहमीच्या कष्टमय आणि रटाळ जीवनात असे उत्सव, सण रंगत आणतात, आनंद देतात आणि ते साजरे केल्यावर माणूस नव्या उत्साहाने पुढील जीवन जगायला सिद्ध होतो. भारतीयांची उत्सवप्रियता तर अफाटच आहे. आपल्याकडील बहुसंख्य उत्सवांना, सणांना काही ना काही पौराणिक, ऐतिहासिक आणि धार्मिक पार्श्वभूमी असल्याने ते भक्तिभावाने साजरे केले जातात. काही सण हे प्रादेशिक असतात. काही सण कुटुंबात साजरे केले जातात तर काही सार्वजनिक स्वरूपात साजरे केले जातात. परंतु, आपल्या जीवनात रंगत आणणाऱ्या, आनंद देणाऱ्या सण, उत्सवांचे, विशेषतः सार्वजनिक उत्सवांचे, स्वरूप गेल्या काही वर्षांपासून मोठ्या प्रमाणात बदलले असून ते जनतेला आनंद देण्याऐवजी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष यातना देणारे ठरत आहेत. त्यावर एक दृष्टिक्षेप टाकणे आणि चर्चा करणे आवश्यक ठरते.

सार्वजनिक सण-उत्सवांचे बदलते स्वरूप ब्रिटिशांविरुद्ध स्वातंत्र्यलढ्यात लोकांमध्ये जागृती, एकजूट निर्माण करण्यासाठी महाराष्ट्रात लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर खरे तर या उत्सवाची तशी आवश्यकता उरली नव्हती. परंतु या उत्सवानिमित्त लोकांनी एकत्रित येणे, प्रबोधनात्मक आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमांचा आस्वाद घेणे होत असल्याने सार्वजनिक गणेशोत्सव लोकांनी चालूच ठेवले. रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंतीही सार्वजनिक स्वरूपात साजरी होत होती आणि होत आहे. नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि अन्य महापुरुषांच्या जयंतीही धुमधडाक्यात साजऱ्या होऊ लागल्या आहेत.

गेल्या काही दशकांपासून या सण-उत्सव-जयंती यांचे स्वरूप पूर्णतः बदलले आहे. त्यातील सोज्वळता, धार्मिकता, आदर हे सारे मागे पडू लागले आहे. आता डॉल्बी-डीजे, लेजर, नाशिक ढोल-ताशे, गॅस सिलिंडरपासून बनवलेल्या मोठ्या घंटा यांचा वापर होतो.

गुजरातमधून आलेला गरबा. उत्तरेकडील छटपूजाही आता महाराष्ट्रात जोर धरू लागली आहे. कावड यात्रा सुरू व्हावी अशी काही धर्माभिमानी लोकांची मागणी आहे. ईद-ए-मिलाद या हजरत महम्मद पैगंबर यांच्या जयंती उत्सवानिमित्त मुस्लिम बांधव बऱ्याच ठिकाणी मिरवणूक काढतात. उत्सवांना राजकारण्यांचे-उद्योजकांचे प्रायोजकत्व सार्वजनिक गणेशोत्सव, गरबा, जयंती यांना बरेचदा कोणत्या ना कोणत्या राजकीय नेत्याचे किंवा छोट्या-मोठ्या उद्योजकांचे प्रायोजकत्व लाभलेले असते. कधी कधी अंडरवर्ल्ड ह्यडॉनह्लसुद्धा या उत्सवांचे प्रायोजक, आश्रयदाते असतात. त्यामुळे उत्सवांना पैशाची कमतरता भासत नाही. परिणामी उत्सव अधिक खर्चिक झाले आहेत. प्रायोजकत्व आले की प्रायोजकांचे मोठमोठे बॅनर्स आलेच. शिवाय सजावटीवर आणि दिखाव्यांवर अफाट पैसा खर्च केला जाऊ लागला आहे. मूर्तींची उंची वाढू लागली आहे. त्यात सणांचे पावित्र्य हरवले आहे. उत्सवांचे व्यापारीकरण झालेले आहे.

नागरिकांना उत्सवांच्या आनंदाऐवजी त्रास बरेच सार्वजनिक उत्सव रस्त्यावर साजरे केले जातात. त्यांच्या पूर्वतयारीसाठी आधी आठवडाभर आणि उत्सवानंतर आठवडाभर रस्ते पूर्णतः किंवा अंशतः बंद असतात. त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. मिरवणुकांमुळे वाहतूक ठप्प असते. या उत्सवांमधील सर्वात धोकादायक प्रकार म्हणजे डॉल्बी डीजे आणि गॅस सिलिंडरपासून बनवलेल्या मोठ्या घंटा. यातून निघणारा आवाज एवढा मोठा असतो की डीजेची गाडी जवळून गेल्यास इमारतीतील भिंती, खिडक्यांची तावदाने हादरतात, माणूस स्वतः हादरतो. डीजेमुळे मृत्यू आल्याच्या बातम्याही आल्या आहेत. वृद्ध, बालके, गरोदर



स्त्रिया, रुग्ण यांचे तर खूपच हाल होतात.

प्रदूषण आणि अन्य बाबी गणेशमूर्ती बनवताना रासायनिक रंग वापरले जातात. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती तर रासायनिक प्रक्रियेनेच बनतात. या मूर्तींचे विसर्जन आपल्या वापराच्या जलस्रोतात केल्यास ते पाणी प्रदूषित होते. असे प्रदूषित पाणी प्यायल्याने कॅन्सरसारखे दुर्धर आजार होऊ शकतात. पाण्यातील जीवसृष्टीवरही त्याचा वाईट परिणाम होतो. प्लास्टर ऑफ पॅरिस मूर्तींवर बंदी येऊ नये म्हणून प्रकरण न्यायालयात नेले आहे.

मिरवणुकीत जो गुलाल मुक्तपणे उधळला जातो त्यात असलेले शिसे आरोग्यास धोकादायक असते. मिरवणूकप्रसंगी आणि उत्सवस्थळी फोडले जाणारे फटाके अत्यंत विषारी वायू उत्सर्जित करतात. या सर्व प्रकारच्या प्रदूषणाचा त्रास सर्वांनाच होतो.

काही मंडळे आपला गणपती नवसाला पावतो म्हणून दावा करतात. त्यामुळे अशा ठिकाणी भक्तांची एकच झुंबड उडते. हे एक प्रकारे अंधश्रद्धेला दिले जाणारे प्रोत्साहनच आहे. या उत्सवांना धार्मिक उन्मादाचे स्वरूप आल्याने मिरवणुकीच्या मार्गालगत असलेल्या अन्य धर्मीय प्रार्थनास्थळांसमोर मिरवणूक येते तेव्हा प्रचंड तणाव निर्माण झालेला असतो. त्या ठिकाणी जास्तीत जास्त वेळ मोठा आवाज करून नाचणे हे हल्ली भूषणावह मानले जाते. ती वेळ पोलीस दलांसाठी परीक्षेची असते. काही दिवसांपूर्वी एक भव्य मूर्ती उत्सव-स्थळी घेऊन जात असताना ती कोसळल्याने दोघांचा मृत्यू झाला आणि पाच लोक जखमी झाले. त्यामुळे अशा भव्य मूर्ती निर्माण करण्याची खरोखरच आवश्यकता आहे का, यावर देखील चर्चा झाली पाहिजे.

माणसांसाठी सण की सणांसाठी माणूस? बदलत्या काळानुसार सण-उत्सव सुद्धा बदलले पाहिजेत हे कोणीही मान्य करेल. परंतु ज्या पद्धतीने हल्ली सण-उत्सव साजरे केले जातात त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास, पर्यावरणास धोका निर्माण होत आहे. हे पाहून प्रश्न पडतो की हे सण, उत्सव माणसांसाठी आहेत की सणांसाठी माणूस आहे? विज्ञानाने लावलेल्या विविध शोधांचा, उदा. डॉल्बी डीजे, लेजर लाइट, प्रकाश योजना यांचा विधायक उपयोग करण्याऐवजी विघातक पद्धतीने का केला जातो आहे? बुद्धीच्या देवाचा उत्सव साजरा करताना बुद्धीचा, साध्या कॉमन सेन्सचा वापर का केला जात नाही? परंपरेचा अभिमान उठसूठ सांगणारे बांधव उत्सवांची धार्मिक, पवित्र परंपरा का पाळत नाहीत? या बदललेल्या उत्सवांना सकारात्मक, सुखद, स्वरूप देण्यासाठी नागरिक पुढाकार का घेत नाहीत?

पुणे येथे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे आणि महापालिका पदाधिकारी यांच्या बैठकीत एका सूज्ञ नागरिकाने, डीजेमुक्त गणेशोत्सव साजरे करावेत अशी सूचना केली असता मंडळांचे पदाधिकारी अत्यंत आक्रमक झाले, चिडले आणि बैठकीत प्रचंड गोंधळ माजला. शेवटी त्या नागरिकास सुरक्षारक्षकांच्या गराड्यात बाहेर काढण्यात आले.

नागरिकांना आपल्या उत्सवामुळे त्रास होतोय, त्यांना डीजेचा आवाज नकोय याबाबत थोडी तरी संवेदनशीलता दाखवायला हे मंडळांचे पदाधिकारी तयार नाहीत! महापालिका पदाधिकारी देखील मंडळांचीच री ओढत मंडळांना मुक्त परवाना देत आहेत. आता उत्सव स्थळाजवळील लोक, एके काळी अत्यंत जिव्हाळ्याचा असलेला हा उत्सव, कधी एकदाचा संपतोय याची सालाबादप्रमाणे असहाय्यपणे वाट पाहत राहतील, गणराया, पुढच्या वर्षी येताना तरी या मंडळांना सद्बुद्धी दे, अशी प्रार्थना करत.

कारंजा - श्री नृसिंह सरस्वतींचे जन्मस्थान !



कारंजा हे पौराणिक आणि ऐतिहासिक नाव श्री करंज ऋषींनी ठेवले. पूर्वी या गावाला करंजनगरी म्हणून ओळखत. या गावांत पाण्याचे दुर्भिक्ष होते. म्हणून या करंज ऋषींनी हातात कुदळ घेवून तलाव खोदण्यास सुरूवात केली. त्याच वेळी उत्तरेतून एक ऋषींचा संघ येथे आला. त्यांनी आपआपल्या कमंडलूतील जल तेथे ओतले आणि एक मोठा जलाशय तयार झाला. हा जलाशय आजही ऋषी तलाव या नावाने ओळखला जातो. ही करंज नगरी जैनांची काशी म्हणून ओळखली जाते. येथे तीन जैन मंदीरे आणि एक जैन गुरूकुल आहे. परंतु हे कारंजा गांव भगवान दत्ताचा व्दितीय अवतार असलेल्या श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराजांचे जन्म ठिकाण म्हणून ओळखले जाते. करंज ऋषींच्या पवित्र कायार्ने पुनित झालेली ही कारंज नगरी भगवान दत्तात्रेयाचा दुसरा अवतार श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराज यांचे जन्मस्थान असून हे स्थान परमपूज्य थोरले स्वामी श्री वासुदेवानंद सरस्वती येथे येईपर्यंत कारंजावासीयांना अज्ञातच होते. स्वामीजींनी हे स्थान भगवान दत्तात्रेयाचा व्दितीय अवतार श्री नृसिंहसरस्वती स्वामी महाराज यांचे जन्मस्थान आहे असे तत्कालीन प.पू. ब्रम्हानंद सरस्वती स्वामी महाराजांना सांगितले. प.पू. ब्रम्हानंद स्वामी पूर्वाश्रमीचे लीलावत होते. त्यांना श्री नृसिंह स्वामी महाराजांची मूर्ती तयार करुन मंदिर बांधण्याची उत्कट इच्छा होती, हे कार्य त्यांना गाणगापुरातच करायचे होते. परंतु असे सांगतात की, प्रत्यक्ष महाराजांनी प.पू. ब्रम्हानंद स्वामींना दृष्टांत देऊन गाणगापूरची जी व्यवस्था आहे ती तशीच राहू द्या, त्यामध्ये काहीही पालट करु नये, आपणास काही कार्य करायचे असेल तर आमचे जन्मस्थान व-हाडात कारंजा येथे आहे. त्या ठिकाणी आपणास जे करायचे असेल ते करा. त्यानंतर प.पू. ब्रम्हानंद सरस्वती महाराज आणि प.पू. वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज यांची भेट झाली असता श्रीं चे जन्मस्थान कारंजालाच आहे ही गोष्ट प.पू. ब्रम्हानंद श्री वासुदेवानंद स्वामींनी प.पू. ब्रम्हानंद स्वामींना स्पष्ट केली, त्याप्रमाणे प.पू. ब्रम्हानंद स्वामी कारंजास आहे.

प.पू. ब्रम्हानंदांनी ह्यश्रींह्ल ची संगमरवरी मूर्ती बनवून घेतली. ती मूर्ती एप्रिल मध्ये कारंजास आणण्यात आली. मंदिर तयार झालेलेच होते. त्यामुळे चैत्र वद्य व्दितीयेला २१ एप्रिल १९३४ रोजी मुतीर्ची स्वामींच्या हस्ते प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.

श्री दत्त संप्रदायात निर्गुण पादुकांचे निरातिशय महत्व आहे. त्या पादुका काशी क्षेत्रातून प.पू. ब्रम्हानंद स्वामींनी कारंजास आणल्या व विधीवत त्यांची प्राणप्रतिष्ठा गर्भगृहात केली. या पादुका सकाळी गंधलेपनाकरीता काढल्या जातात आणि दुपारची आरती झाल्यावर देव्हा-यात ठेवल्या जातात. या पादुकांना अत्तर, केशर यांचे गंधलेपन नियमीतपणे होत असते. तसेच या संस्थेचा कार्यक्रम कशा प्रकारचा असावा हे प.पू. ब्रम्हानंद स्वामींनी ठरवून दिले आहे. सकाळी साडेपाचला काकड आरती, त्यानंतर महाराजांना लघुरुद्र व पंचोपचार पूजा, त्यानंतर सत्यदत्त पूजा. सायं. पुजा. पंचपदी, रात्री साडे आठला आरती अन् त्यानंतर अष्टके व शंखोवक होऊन इतर काही कार्यक्रम नसल्यास शेजारती होते आणि नंतर कपाट बंद होते. कुठल्याही परिस्थीतीत कपाटे दुस-या दिवशीच्या काकड आरती पर्यंत उघडले जात नाही. या ठिकाणच्या पुजा-याला त्रिकाल स्नान करुन गाभा-यात जावे लागते. तेही त्यांनी घरुन स्नान करुन आलेले चालत नाही. आचारी व पुजारी यांच्याकरिता स्वतंत्र स्नानगृह आहे. तेथेच स्नान करुन नंतर ते आपआपल्या कामी लागतात. पुजा-याशिवाय कोणालाही ह्यश्रींह्ल च्या गर्भगृहात प्रवेश नाही. हे ठिकाण अतिशय जागृत आहे. याचा प्रत्यय विविध मंडळास वारंवार येत असतो.

उज्जैन येथील महर्षि सांदीपनि आश्रम !





सांदीपनिऋषी यांच्या जयंतीनिमित्ताने

महर्षि सांदीपनिऋषी यांचे तपस्थान

आश्रमातील बलराम, श्रीकृष्ण आणि सुदामा यांच्या मूर्ती

बेलपत्रात प्रकट झालेले सर्वेश्वर महादेवाचे शिवलिंग. या शिवलिंगाच्या जलधारेमध्ये वेटोळे घातलेला स्वयंभू शेष आहे

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुदेवो महेश्वरः।
गुरुरेव परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः॥

अर्थ : गुरु स्वतःच ब्रह्मा, विष्णु आणि महेश्वर आहेत. तेच परब्रह्म आहेत. अशा गुरूंना मी नमस्कार करतो.

जगद्गुरु भगवान श्रीकृष्णाचे गुरु म्हणजे सांदीपनिऋषी ! अशा या गुरुवर्य सांदीपनिऋषी यांची आज मार्गशीर्ष शुक्ल पक्ष द्वादशीला जयंती आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांचे स्मरण करूया.

मध्यप्रदेशमधील उज्जैन येथे असलेल्या सांदीपनिऋषींच्या आश्रमामध्ये श्रीकृष्णाने ६४ दिवस राहून १६ विद्या आणि६४ कला ग्रहण केल्या, असे सांगितले जाते. ४ दिवसांत ४ वेद, ६ दिवसांत ६ शास्त्रे, १६ दिवसांत १६ विद्या, १८ दिवसांत १८ पुराणे, २० दिवसांत गीतेचे ज्ञान, गुरुसेवा आणि गुरुदक्षिणा, हे सर्व मिळून ६४ दिवसांत पूर्ण केले होते. सध्या या ठिकाणी श्रीकृष्ण, सुदामा, बलराम आणि सांदीपनिऋषी यांच्या मूर्ती ठेवलेल्या आहेत. या जागेला मंदिराचे स्वरूप दिले आहे.

भगवान श्रीकृष्णाने उज्जैनमधील सांदीपनिऋषींचा आश्रमच अध्ययनासाठी का निवडला ? ते काशीला का गेले नाहीत, याविषयीची माहिती पुढीलप्रमाणे आहे. काशी येथे जरासंधाचे राज्य होते आणि जरासंध कंसाचा मित्र होता. त्यामुळे त्या ठिकाणी सतत संघर्ष झाला असता.

सांदीपनिऋषी हे त्यांच्या ७ पुत्रांच्या वियोगाने काशी सोडून उज्जैन येथे आले होते. उज्जैन येथे त्या वेळी दुष्काळ पडला होता. सांदीपनिऋषी आता



आश्रम असलेल्या ठिकाणी त्यांच्या पत्नीसह एका झाडाखाली बसलेले तेथील लोकांनी पाहिले. त्यांच्या मुखावरील तेज पाहून ते कोणीतरी संत महात्मा आहेत, हे लोकांच्या लक्षात आले. ते दुष्काळापासून आपल्याला वाचवतील, असे त्यांना वाटले. सांदीपनिऋषींना शरण जाऊया, असे त्यांनी ठरवले.

सांदीपनिऋषी यांनी याच ठिकाणी अनेक वर्षे तपश्चर्या केली. त्यांच्या तपश्चर्येने भगवान शिव यांनी त्यांना दर्शन दिले आणि ह्यमहाकाल या नावाने माझे मंदिर राहील, तोपर्यंत या भागात दुष्काळ पडणार नाहीह्ल, असे वरदान दिले. भगवान शिवाने या वेळी सांदीपनिऋषी यांना स्वतःसाठी काहीतरी मागण्यास सांगितल्यावर सांदीपनिऋषी यांनी काही मागितले नाही; परंतु त्यांच्या पत्नीने मातृप्रेमापोटी त्यांचे मृत ७ पुत्रांची अभिलाषा व्यक्त केली. या वेळी शिवाने गीतेतील कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषू कदाचन, हे वचन सांगून फळाची अपेक्षा न ठेवता कर्म करा, कमार्चे फल तुम्हाला मिळणारच, असे सांगितले. तसेच तुम्ही येथे गुरुकुल स्थापन करा. द्वापरयुगात या गुरुकुलात शिकण्यासाठी दोन विद्यार्थी येतील. ते विद्यार्थी गुरुदक्षिणा म्हणून तुमचे पुत्र आणून देतील. असे सांगून शिव बेलपत्रात अंतर्धान पावले. याच बेलपत्रात एक शिवलिंग प्रकट झाले. तोच सर्वेश्वर महादेव !

या शिवलिंगाच्या जलधारेमध्ये वेटोळे घातलेला स्वयंभू शेष आहे. या शिवपिंडीवर धानस्थ ऋषीचिन्ह आहे. या मंदिराच्या आत एक शिळा आहे. या शिळेवर श्रीकृष्ण अध्ययनासाठी आणि शिवाच्या पूजेसाठी बसत असत. (याचा उल्लेख पुराणांमध्ये आहे.) ही शिळा चौकोनी आहे. या मंदिराच्या बाहेरील नंदीची प्रतिमा ही अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. आतापर्यंत सर्व शिवमंदिरांमध्ये नंदी बसलेल्या स्थितीत आपण पहातो; परंतु या ठिकाणी नंदी उभा असलेला दिसतो.

गोमती कुंड

या ठिकाणी गोमती कुंड आहे. सांदीपनिऋषी प्रतिदिन स्नानासाठी गोमती नदीवर जात असत. ते एवढ्या लांब जात असल्याचे पाहून ११ वर्षांच्या श्रीकृष्णाने त्यांना त्यांनीच शिकवलेल्या कलेद्वारे गोमतीचे जल आश्रमाच्या ठिकाणी आणू का, असे विचारले. त्या वेळी सांदीपनीऋषींना हा ११ वर्षांचा विद्यार्थी म्हणजे प्रत्यक्ष विष्णूचा अवतार आहे, हे माहिती नव्हते. श्रीकृष्णाने पुन्हापुन्हा आग्रह केल्यावर त्यांनी श्रीकृष्णाला सांगितले की, तुला शक्य असल्यास गोमतीचे जल आण. श्रीकृष्णाने त्याच्या धनुष्यावर बाण चढवला. ते पाहून गोमती नदी थरथर कापू लागली. तिने त्या ठिकाणी येऊन श्रीकृष्णाला दर्शन दिले आणि अनेक युगे येथे रहाण्याचे आश्वासन दिले. या कुंडात सांदीपनिऋषी स्नान करत असत. (ही माहिती सांदीपनि ऋषींचे २२वे वंशज श्री. राहुल व्यास यांनी दिली.)

पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

संमिश्र


४

मुंबई, मंगळवार,०१ सप्टेंबर २०२६ ते ०७ सप्टेंबर २०२६

वनजमिनीवरील खासगी नोंद रद्द

'महाराष्ट्र शासन राखीव वने' नोंद कायम...

तीन महिन्यांत चौकशीचे आदेश : चंद्रशेखर बावनकुळे



भाईंदरपाडा (ओवळे) येथील तब्बल ३७४ हेक्टर ७९ आर वनजमिनीच्या मालकी हक्कावरून सुरू असलेल्या वादात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतलेल्या निर्णयामुळे ठाणेकरांना मोठा दिलासा मिळाला आहे.

ठाणे। भाईंदरपाडा (ओवळे) येथील तब्बल ३७४ हेक्टर ७९ आर वनजमिनीच्या मालकी हक्कावरून सुरू असलेल्या वादात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतलेल्या निर्णयामुळे ठाणेकरांना मोठा दिलासा मिळाला आहे. या जमिनीच्या अधिकार अभिलेखावर खासगी व्यक्तींच्या नावाने करण्यात आलेली फेरफार नोंद क्रमांक ९७५ रद्द करून संबंधित जमिनीवर पुन्हा 'महाराष्ट्र शासन राखीव वने' अशी नोंद कायम ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच, या संपूर्ण प्रकरणाची तीन महिन्यांत सखोल चौकशी करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

मौजे भाईंदरपाडा (ओवळे) येथील जुना सर्व्हे क्रमांक २९१ पैकी नवीन सर्व्हे क्रमांक २२/१, क्षेत्र ३७४-७९-५० हेक्टर, तसेच २२/४, २२/५ आणि जुना सर्व्हे क्रमांक २९७ पैकी नवीन सर्व्हे क्रमांक २१ या जमिनी या वादाच्या केंद्रस्थानी आहेत. संबंधित जमिनीवर वनविभागाचा दावा असून, भारतीय वन अधिनियमातील तरतुदींनुसार हे क्षेत्र वन म्हणून अधिसूचित करण्यात आल्याचे विभागाने महसूल मंत्र्यांसमोरील सुनावणीत सांगितले. यानंतर प्रकरण अपर आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडे गेले. त्यांनी ११ जानेवारी २०१९ रोजी उपविभागीय अधिकारी आणि अप्पर जिल्हाधिकारी यांचे आदेश रद्द करून फेरफार नोंद क्रमांक ९७५ कायम केली. या निर्णयाची अंमलबजावणी होत नसल्याने संबंधितांनी उच्च न्यायालयात धाव घेतली. ३१ डिसेंबर २०२५ रोजी महसूल मंत्र्यांच्या न्यायासनाने अपर आयुक्तांचा २०१९ चा आदेश कायम ठेवून फेरफार नोंद क्रमांक ९७५ कायम केली होती. मात्र, या आदेशाविरोधात महसूल व वनविभागाने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम २५८ अंतर्गत पुनर्विलोकन अर्ज दाखल केला. या अर्जावर सुनावणी करताना उच्च न्यायालयाचा ७ मे २०२५ रोजीचा आदेश संबंधित परिस्थितीत अनिवार्य नसून निदेर्शात्मक स्वरूपाचा असल्याचे महसूल मंत्र्यांनी स्पष्ट केले. या पार्श्वभूमीवर ६ ऑगस्ट २०२६ रोजी पुनर्विलोकन अर्ज मंजूर करून ३१ डिसेंबर २०२५ चा आदेश तसेच अप्पर आयुक्तांचा ११ जानेवारी २०१९ रोजीचा आदेश रद्द करण्यात आला. त्याचबरोबर अप्पर जिल्हाधिकारी (अपिले), ठाणे यांचा २१ मार्च २०१७ आणि उपविभागीय अधिकारी, ठाणे यांचा १ ऑगस्ट २०१५ रोजीचा आदेश कायम ठेवण्यात आला. त्यामुळे फेरफार नोंद क्रमांक ९७५ रद्द करून अधिकार अभिलेखावर 'महाराष्ट्र शासन राखीव वने' अशी नोंद कायम ठेवण्याचे आदेश देण्यात आले. उच्च न्यायालयातील याचिका प्रलंबित या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका क्रमांक १३४४/२०२५ दाखल करण्यात आली. ७ मे २०२५ रोजी उच्च न्यायालयाने संबंधितांनी दिलेल्या हमीच्या अधीन राहून अपर आयुक्तांच्या ११ जानेवारी २०१९ रोजीच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यास मुभा दिली. त्यानंतरही अंमलबजावणी न झाल्याने अवमान याचिका क्रमांक ४९९/२०२५ दाखल करण्यात आली. दरम्यान, वनविभागाने २०१५ मधील महसूल न्यायाधिकरणाच्या निर्णयाला आव्हान देणारी रिट याचिका क्रमांक ४५३५/२०१६ उच्च न्यायालयात दाखल केली आहे. ही याचिका अद्याप प्रलंबित आहे. त्यामुळे वन दजार्बाबत अंतिम न्यायालयीन निर्णय होण्यापूर्वी फेरफार नोंद कायम करणे योग्य आहे का, हा महत्त्वाचा मुद्दा महसूल मंत्र्यांसमोर होता. तीन महिन्यांत चौकशीचा अहवाल महसूल मंत्र्यांनी जिल्हाधिकारी, ठाणे यांना प्रकरणाची नव्याने सखोल चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. महसूल अभिलेख, उपलब्ध कागदपत्रे तसेच उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या वनविभागाच्या दाव्यांच्या अनुषंगाने ही चौकशी करण्यात येणार आहे. त्याचा अहवाल तीन महिन्यांच्या आत सादर करावा लागणार आहे. महसूल अभिलेखात पुन्हा 'महाराष्ट्र शासन राखीव वने' अशी नोंद झाल्याने ठाणेकरांना तूर्तास दिलासा मिळाला असला, तरी जमिनीच्या मालकी आणि वन दजार्बाबतचा न्यायालयीन वाद अद्याप कायम आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांच्या चौकशी अहवालासह उच्च न्यायालयातील प्रलंबित याचिकांच्या निकालाकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. २०१५ मध्ये खासगी व्यक्तींची नावे महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाने ५ मार्च २०१५ रोजी दिलेल्या निर्णयात संबंधित जमीन 'वन' या संज्ञेत येत नसल्याचे नमूद केले होते. त्यानंतर फेरफार नोंद क्रमांक ९७५ प्रमाणित करून अधिकार अभिलेखावर खासगी व्यक्तींची नावे दाखल करण्यात आली आणि 'महाराष्ट्र शासन राखीव वने' ही नोंद कमी करण्यात आली. मात्र, या प्रक्रियेला महसूल प्रशासनाने आक्षेप घेतला. उपविभागीय अधिकारी, ठाणे यांनी १ ऑगस्ट २०१५ रोजी फेरफार नोंद क्रमांक ९७५ आणि संबंधित फेरफार नोंदी रद्द केल्या. त्यानंतर अप्पर जिल्हाधिकारी (अपिले), ठाणे यांनी २१ मार्च २०१७ रोजी हा निर्णय कायम ठेवला.

भोजपुरी, हिंदी बोलू पण मराठी बोलणार नाही !

कांदिवलीत अमराठी रिक्षा चालकांची दादागिरी, ट्रॅफिक जाम करुन मुजोरी

अमराठी रिक्षा चालकांना दणका बसणारच

राज्यात अमराठी रिक्षा चालकांवर कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे. अमराठी शिकण्याची संधी देऊनही मराठी न शिकलेल्यांवर कारवाई होणार आहे. सरकारच्या निर्णयाने अमराठी रिक्षाचालक अस्वस्थ झाले आहेत. काही अमराठी रिक्षाचालकांनी कांदिवलीत रास्ता रोको केला. एका अमराठी रिक्षाचालकाने थेट मराठी रिक्षा चालकाला मारहाण केल्याचे समोर आलं आहे. अमराठी चालकांवरील कारवाईच्या मुद्दयांवरून वातावरण तापलं असताना परिवरहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी संजय निरुपम यांच्यासोबत पत्रकार परिषद घेतली. अमराठी रिक्षा चालकांना दणका बसणारच आहे. आता कारवाई कशी करण्यात येईल, याविषयी माहिती प्रताप सरनाईक यांनी दिली.



मुंबई,मराठी बोलता न येणाऱ्या टॅक्सी आणि ऑटो रिक्षाचालकांविरोधात राज्य सरकारच्या RTO विभागाने कारवाई सुरु केली आहे. त्याला विरोध म्हणून आज कांदिवली लिंक रोडवर लालजीपाडा येथे काही अमराठी रिक्षा चालकांनी दादागिरी केली. या रिक्षा चालकांनी आपली मुजोरी दाखवून दिली. आम्ही मराठी भाषा नाहीच बोलणार हाच संदेश त्यांनी आपल्या कृतीमधून दिला. कांदिवली लिंक रोडवर मराठी सक्तीविरोधात हे रिक्षा चालक दादागिरी दाखवत आहेत. मरा-ठी सक्तीच्या विरोधात रिक्षा रोखून आंदोलन सुरु आहे. लिंक रोडवर 20 मिनिटांपासून वाहतूक जाम झाली आहे. जे रिक्षाचालक प्रवासी वाहतूक करत होते, त्यांना धमकावलं जात होतं. लिंक रोडवरून प्रवासी घेऊन जाणाऱ्या दुसऱ्या ऑटो रिक्षा चालकांना धमकावण्याचा प्रकार घडला. अमराठी रिक्षा चालकांनी रस्ता रोको केला. याला आंदोलन म्हणता येणार नाही. कारण राज्य सरकारने मराठी बोलता न येणाऱ्या मराठी रिक्षा चालकांना मागच्या काही महिन्यांपासून बरीच मुदतवाढ दिली होती. त्यांना मराठी शिकण्यासाठी क्लासेसचीही व्यवस्था केली होती. मात्र तरीही काही टॅक्सी, रिक्षा चालक मराठी सक्ती विरोधात आंदोलन करत आहेत. रिक्षा चालकांकडून हंगामा : कांदिवलीत मराठी सक्तीवरून रिक्षा चालकांच्या या आंदोलनामुळे तणाव निर्माण झाला आहे. मराठी सक्ती विरोधात अमराठी रिक्षा चालक हंगामा करत आहेत. कांदिवली लिंक रोडवर गेल्या 30 मिनिटांपासून अमराठी रिक्षा चालकांकडून हंगामा सुरू आहे. प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या रिक्षा चालकांना अडवून त्यांना धमकावले जात आहे. आरटीओकडून कारवाई : संपूर्ण लिंक रोड जाम करून ठेवण्यात आला आहे. मराठी भाषा येत नसलेल्या ऑटो रिक्षा चालकांवर आरटीओकडून कारवाई केली जात आहे, या कारवाईच्या विरोधात हे अमराठी रिक्षा चालक रस्त्यावर उतरून दादागिरी करत आहेत.सध्या कांदिवली पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून लिंक रोड मोकळा करण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र या रिक्षा चालकांनी आज रिक्षा संप पुकारल्यामुळे लिंक रोडवर प्रवाशांची मोठी गर्दी झाली आहे.

कल्याण पूर्वेत अल्पवयीन मुलींना घरात डांबून ठेवल्याचा प्रकार; चौघींची सुटका, एक संशयित ताब्यात



कल्याण : कल्याण पूर्वेत अल्पवयीन मुलींना जबरदस्तीने एका घरात डांबून ठेवल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. एका पीडित मुलीने प्रसंगावधान राखून आईला पाठवलेल्या लाईव्ह लोकेशन मुळे हा प्रकार समोर आला. पोलिसांनी तातडीने कारवाई करत संबंधित मुलीसह अन्य तीन अल्पवयीन मुलींची सुटका केली असून, चेतन माने नावाच्या तरुणाला ताब्यात घेतले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एक अल्पवयीन मुलगी अचानक बेपत्ता झाली होती. ती मैत्रिणीकडे किंवा नातेवाईकांकडे गेली असावी, असा सुरुवातीला कुटुंबीयांचा समज होता. मात्र, काही वेळाने या मुलीने मोबाईलवरून आईशी संपर्क साधला. एका तरुणाकडून आपल्याला त्रास दिला जात असून, द्वारली परिसरातील एका बंद घरात जबरदस्तीने डांबून ठेवल्याचे तिने आईला सांगितले.

कसाबसा घराबाहेर पडून एका इमारतीखाली लपल्याचेही तिने आईला कळवले. त्यानंतर आईने मुलीला तातडीने आपले लाईव्ह लोकेशन पाठवण्यास सांगितले. तसेच आपत्कालीन मदत क्रमांकावर संपर्क साधून पोलिसांना घटनेची माहिती दिली.

माहिती मिळताच पोलिसांचे पथक आणि मुलीचे नातेवाईक संबंधित ठिकाणी पोहोचले. पोलिसांनी कारवाई करत संबंधित मुलीसह घरात असलेल्या अन्य तीन अल्पवयीन मुलींची सुखरूप सुटका केली.

या प्रकरणी चेतन माने या संशयित तरुणाला पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्याच्याविरुद्ध यापूर्वीही अल्पवयीन मुलींशी संबंधित गुन्हे दाखल असल्याची प्राथमिक माहिती पोलिस तपासात समोर आली आहे.

दरम्यान, या मुलींना नेमक्या कोणत्या कारणासाठी घरात डांबून ठेवण्यात आले होते, त्यांच्यावर काही अत्याचार झाले का, तसेच या प्रकारामागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास कोळसेवाडी पोलिसांकडून सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, पालकांमध्येही चिंता व्यक्त केली जात आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,

भाईंदर (प.). ता. ठाणे ४०१ १०१ दुरध्वनी क्र. २८१८११८२

पशुसंवर्धन विभाग

जा.क्र. मनपा/प.सं. /१००/२०२६-२७ **दिनांक : ३१/०८/२०२६**

// जाहिर फेर निविदा नोटीस//

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील पशु प्राथमिक उपचार केंद्र शांती नगर एस. टी. पी. प्लांट, मिरा रोड (पुर्व) येथे औषधपुरवठा करणेसाठी **E – Tendering** पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहेत. सदर कामाची कोरी निविदापत्रके **दि. ०१/०९/२०२६ ते ०७/०९/२०२६** रोजीपर्यंत शासनाच्या **E – Tendering** संकेतस्थळ **www.mahatenders.gov.in** येथे उपलब्ध होतील. निविदाधारकाने निविदा फॉर्म व इसारा रक्कम ऑन लाईन रिसिप्ट सिस्टिमव्दारे भरणा करावी. अन्यथा निविदा ग्राह्य समजण्यात येणार नाही.

सदर कामी मागविलेल्या निविदा **E – Tendering** पध्दतीने **दि. ०८/०९/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत वरील संकेतस्थळावर स्विकारण्यात येतील व दि. ०९/०९/२०२६ रोजी दुपारी ४.०० वा. उघडण्यात येतील.**

अ.क्र.	कामाचे नाव	को-या निविदा पत्रकाची किंमत	निविदा बयाणा रक्कम
1.	**आजारी पशुंकरिता प्राथमिक उपचारासाठी अत्यावश्यक औषधसाठा पुरवठा करणेबाबत. (कालावधी 2 वर्षे) Supply of essential medicines for first aid of sick animals (Period – 2 Years)**	**मुळ किंमत रु. ५७००/- (GST 18%= रु. ६७२६/-)**	**रु. १९,०००/-**

टीप :-

1. निविदा दोन लिफाफा पदध्तीने (ऑनलाईन) सादर कराव्यात.
2. निविदा फॉर्म फी परत केली जाणार नाही.
3. आलेल्या निविदा मधील कोणतीही एक निविदा स्विकारण्याचा किंवा सर्वच निविदा नाकारण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवलेला आहे. त्याबद्दल कोणतेही स्पष्टीकरण दिले जाणार नाही.

जा.क्र.मनपा/मावज/जाहि./ई-९६७९९७४/२०२६-२७

दि. ३१/०८/२०२६

सही /-

(स्वप्निल सावंत)

उप आयुक्त (पशुसंवर्धन)

मिरा भाईंदर महानगरपालिका

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com